# परदेशात आम्हीही जपतो मराठी बाणा : अनिल नेने

शिवाजी गोरे | दि. १३ (चिपळूण)

**भारतातील** मराठी नागरिकांपेक्षा परदेशातील मराठी माणूस अधिक सुसंस्कृत आहे. आजही परदेशात आम्ही मराठी बाणा जपत असल्याचे अनिवासी भारतीय अनिल नेने यांनी 'विदेशातील मराठीचा जागर' या परिसंवादात सांगितले.

परिसंवादाचे अध्यक्ष जयंत बापट म्हणाले, भारतात मराठी भाषेचे धिंडवडे निघाले असले तरी आम्ही मायबोली मराठी भाषा अधिक शुद्ध बोलतो. आमची अन्नदाती भाषा इंग्रजी असली तरीही मराठी आमची माय आहे. परदेशात राहून सुद्धा मायभूमीची नाळ आम्ही तोडलेली नाही. परदेशातील महाराष्ट्र मंडळ आमचे प्रेरणास्थान आहे. त्याच्या माध्यमातून आम्ही मराठी संस्कृतीचा ठेवा जपला आहे.

या परिसंवादात जयंत बापट, संतोष अंबिके, मंदार जोगळेकर, हसन चौगुले यांनी परदेशातील 'मराठी बाणा' संदर्भात मार्गदर्शन केले.

परदेशात मराठी सशक्त रहावी म्हणून आम्ही सर्वजण एकत्रीतपणे प्रयत्न करतो. १९३२ मध्ये पहिले महाराष्ट्र मंडळ लंडन येथे स्थापन झाले. माहिती तंत्रज्ञानाच्या युगातही मराठी माणसाला परदेशात आता फार अडचणी येत नाहीत. परंतु, पूर्वी आम्ही मराठी माणसे फार दहशतीखाली वागायचो. बंद दाराच्या आत मराठी आणि दार उघडले की, इंग्रजीचे आक्रमण व्हायचे.

शिवाजी गोरे



साहित्य संमेलनात रविवारी विदेशातील मराठीचा जागर या परिसंवादात बोलताना मंदार जोगळेकर. व्यासपीठावर जयंत बापट, संतोष अंबिके, नोहा मसील, अनिल नेने, हसन चौगुले.

माकडचेष्टाप्रमाणे इंग्रजी भाषा मराठीला वाकुल्या दाखवायची. परंतु, आता मराठी माणसे परदेशातही मायबोलीतून साहित्यनिर्मिती करीत आहेत. त्यामुळे आम्हाला दर्जेदार मराठी साहित्य वाचायला मिळते. परदेशात आजही मराठी व महाराष्ट्राचे प्रतिबिंब दिसतात. आम्ही महाराष्ट्र मंडळाच्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रम घेतो. महाराष्ट्राप्रमाणे तिथे गर्दी होत नसली तरीही मराठीचे दर्दी मात्र पाहायला मिळतात.

कोकणचे सुपुत्र हसन चौगुले यांनी मुस्लीम समाज व मराठीचे अतूट नाते विशद केले. कोकणातील मुस्लीम समाज परदेशात कोकणी मराठी भाषा बोलतो. परकीय चलन मिळवून देणाऱ्या मुस्लीम समाज व भारतीय संस्कृतीची नाळ तुटलेली नाही. मुस्लीम समाज मराठीवर अपार प्रेम करतो. मातृभूमी व मराठी भाषा मातेसमान आहे. परदेशातील मुस्लीम बांधवांना मराठीने एका धाग्यात बांधून ठेवले आहे. परदेशात मराठी हीच आमची जात आहे. मराठीच्या जपणुकीसाठी आम्ही प्रयत्नरत आहोत.